मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 19 जून 2026 | पान- 1

# पिंपरी-चिंचवडला मिळणार 'पुस्तकांची नगरी' म्हणून नवी ओळख..!

## महापौर रवि लांडगे यांची दूरदर्शी संकल्पना; सीएसआर निधीतून साकार होणार 'अक्षरविश्व' ज्ञानसंकुल



> उद्योगनगरी म्हणून देशभरात नाव कमावलेल्या पिंपरी-चिंचवडला आता 'ज्ञाननगरी' आणि 'पुस्तकांची नगरी' म्हणून नवी ओळख मिळवून देणे, हीच 'अक्षरविश्व' मागची प्रेरणा आहे. भावी पिढ्यांसाठी ज्ञानाचा कायमस्वरूपी ठेवा निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. 'अक्षरविश्व' प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर तो केवळ एका इमारतीपुरता मर्यादित राहणार नाही, तर पिंपरी-चिंचवडच्या सांस्कृतिक, शैक्षणिक आणि बौद्धिक पुनर्जागरणाचा भक्कम पाया ठरेल.
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहराला केवळ औद्योगिक नगरी म्हणून नव्हे, तर ज्ञान, साहित्य, संस्कृती आणि संशोधनाचे केंद्र म्हणून नवी ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने महापौर भा. रवि लांडगे यांच्या संकल्पनेतून 'अक्षरविश्व' या अत्याधुनिक ज्ञानसंकुलाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकार होत आहे. १५ जून २०२६ रोजी झालेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मौजे भोसरी (कासारवाडी) येथील सार्वजनिक सुविधा क्षेत्रातील सुमारे ८,८३१.३६ चौरस मीटर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे अत्याधुनिक ग्रंथालय आणि ज्ञानसंकुल उभारण्याच्या उपसूचनेस मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प आनंदग्राम सामाजिक सेवाभावी संस्था, भोसरी यांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे.

या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण 'अक्षरविश्व' ज्ञानसंकुल कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) निधीतून उभारण्यात येणार असून महानगरपालिकेच्या निधीतील एकही रुपया खर्च होणार नाही. त्यामुळे शहरवासीयांना जागतिक दर्जाच्या ज्ञानसुविधा उपलब्ध होणार असून त्यासाठी महापालिकेवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. विशेष म्हणजे, प्रकल्पासाठी निधी कमी पडल्यास स्वतः आर्थिक योगदान देण्याची तयारी महापौर रवि लांडगे यांनी दर्शविली आहे.

'अक्षरविश्व' हे केवळ ग्रंथालय नसून एक सर्वसमावेशक ज्ञानसंकुल असेल. यामध्ये अत्याधुनिक ग्रंथालय, डिजिटल अभ्यासिका, ई-लायब्ररी, स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्र, संशोधन सुविधा, मराठी साहित्य परिषद कार्यालय, मनोमय कक्ष, व्याख्यान सभागृह, लेखक संवाद केंद्र, पुस्तक प्रकाशनासाठी स्वतंत्र सभागृह तसेच विविध शैक्षणिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक उपक्रमांसाठी आवश्यक सुविधा विकसित करण्यात येणार आहेत.

महापौर रवि लांडगे यांची संकल्पना शहरातील विद्यार्थी, युवक आणि अभ्यासकांना पुणे, मुंबई अथवा इतर महानगरांमध्ये उपलब्ध असणाऱ्या दर्जेदार ज्ञानसुविधा पिंपरी-चिंचवडमध्येच उपलब्ध करून देण्याची आहे. आज अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि संशोधनासाठी इतर शहरांकडे वळतात. मात्र 'अक्षरविश्व' उभारल्यानंतर पिंपरी-चिंचवड हेच अभ्यास, संशोधन आणि वाचन संस्कृतीचे प्रमुख केंद्र म्हणून विकसित होणार आहे.

या ज्ञानसंकुलामुळे राज्यातील आणि देशातील नामवंत लेखक, साहित्यिक, कवी, विचारवंत, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांचे शहरात सातत्याने आगमन होईल. साहित्य संमेलने, पुस्तक प्रदर्शने, व्याख्यानमाला, लेखक भेट कार्यक्रम, चर्चासत्रे आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांमुळे शहरात समृद्ध बौद्धिक वातावरण निर्माण होईल.

येत्या काही वर्षांत पिंपरी-चिंचवडची ओळख केवळ उद्योगनगरी म्हणून नव्हे, तर 'पुस्तकांची नगरी,' 'ज्ञाननगरी' आणि 'वाचनसंस्कृतीचे केंद्र' म्हणून निर्माण करण्याची क्षमता या प्रकल्पामध्ये आहे. महाराष्ट्रातील अनेक नामवंत लेखक, साहित्यिक आणि प्रकाशन संस्थांचे हे आवडते केंद्र बनू शकते. महापौर रवि लांडगे यांनी शहराच्या विकासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक केला आहे.

# लांडगेनगरमधील वीज समस्येला अखेर पूर्णविराम; नागरिकांना मोठा दिलासा...

## भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महावितरण प्रशासनाशी समन्वय साधून तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.





**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरीतील लांडगेनगर परिसरातील नागरिकांना अनेक दिवसांपासून भेडसावत असलेल्या कमी दाबाच्या व वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या समस्येवर अखेर तोडगा निघाला आहे. स्थानिक नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महावितरण प्रशासनाशी समन्वय साधून तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

त्याअनुषंगाने परिसरात २०० मीटर एल.टी. केबल टाकण्यात आली असून नवीन ४-वे फिडर पिलर बसविण्यात आला आहे. त्यामुळे वीजपुरवठा अधिक सक्षम व सुरळीत झाला असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आमदार महेश लांडगे यांनी सांगितले की, वाढती वीज मागणी लक्षात घेऊन मतदारसंघातील विद्युत पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. मोशी सफारी पार्क, चऱ्होली येथील अतिउच्चदाब उपकेंद्रे, भोसरीतील नवीन स्विचिंग उपकेंद्र तसेच ओव्हरहेड वीजवाहिन्यांचे भूमिगतकरण यांसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. नागरिकांना दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा मिळावा, हीच प्राथमिकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# सल्लागार संस्थांच्या मनमानीला लगाम; पीसीएमसी स्थायी समितीची कठोर भूमिका

## 'सल्लागार संस्कृती'ला बसणार चाप; अनावश्यक खर्चावर स्थायी समिती सभापती अभिषेक बारणेंचा 'हातोडा'

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत सल्लागार संस्थांच्या मनमानी कारभारावर आणि त्यांच्यावर होणाऱ्या अवाढव्य खर्चावर स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी कठोर भूमिका घेतली आहे. प्रशासकीय कामात सल्लागारांचा वाढता हस्तक्षेप आणि 'त्याच' संस्थांना वारंवार दिली जाणारी कामे यावर नगरसेवकांनी नाराजी व्यक्त करत, यापुढे प्रत्येक लहान-मोठ्या कामासाठी सल्लागार नेमण्याची प्रथा बंद करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.



स्थायी समितीच्या बैठकीत हा विषय गाजला. बैठकीत बोलताना सभापती अभिषेक बारणे यांनी प्रशासनाला आरसा दाखवत सवाल केला की, "महापालिकेत तांत्रिकदृष्ट्या सक्षम अधिकारी आणि अभियंता वर्ग उपलब्ध असताना, प्रत्येक कामासाठी बाहेरच्या सल्लागारांची गरज काय? सल्लागारांच्या खांद्यावर जबाबदारी ढकलून मोकळे होणे आता थांबवले पाहिजे. आपल्या अधिकाऱ्यांनी स्वतःच्या विभागातील कामाची जबाबदारी स्वतः पेलली पाहिजे."

काही विशिष्ट सल्लागार संस्थांच्या कामाबद्दल गेल्या काही दिवसांत लोकप्रतिनिधी आणि नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर तक्रारी येत आहेत. प्रकल्पांमधील नियोजनातील त्रुटी, वेळेचा अपव्यय आणि दर्जाहीन कामे यामुळे महापालिकेची प्रतिमा मलीन होत आहे. यावर भाष्य करताना बारणे म्हणाले की, "विशिष्ट संस्थांनाच वारंवार कामे देऊन कोणाचे हित साधले जात आहे? त्यांच्या कामाच्या दर्जाबाबत वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित होत असूनही त्यांना पाठीशी का घातले जात आहे, याचा जाब आता प्रशासनाला द्यावा लागेल."

### खर्च कपातीचा निर्णय शहराच्या हिताचा..

» या निर्णयामुळे महापालिकेच्या आर्थिक शिस्तीला मोठी बळकटी मिळणार आहे. बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, आता महापालिकेतील चालू सल्लागार करारांची तातडीने समीक्षा केली जाणार आहे. ज्या कामांसाठी सल्लागारांची आवश्यकता नाही, त्यांचे करार त्वरित रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश बारणे यांनी दिले आहेत. सभापतींच्या या 'हातोड्या'मुळे महापालिकेतील सल्लागार संस्कृतीला लगाम बसणार असून, प्रशासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

> "महापालिकेच्या तिजोरीचा प्रत्येक रुपया हा करदात्या नागरिकांचा आहे. अनावश्यक सल्लागारांवर होणारा कोट्यवधींचा खर्च हा जनतेच्या पैशांचा गैरवापर आहे. मी प्रशासनाला स्पष्ट बजावले आहे की, यापुढे केवळ अत्यंत गुंतागुंतीच्या तांत्रिक कामांसाठीच सल्लागारांची नियुक्ती करावी. प्रशासनातील प्रत्येक अधिकाऱ्याने आपल्या कामाची पूर्ण जबाबदारी स्वीकारावी. जे अधिकारी जबाबदारी झटकून सल्लागारांच्या मागे लपतील, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. खर्च कपात करून हा निधी आपल्याला शहराच्या मूलभूत सुविधांसाठी वापरता येईल."
>
> \- अभिषेक बारणे, सभापती स्थायी समिती, पिंपरी चिंचवड

# पाणीटंचाई निवारणासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्तांचे कडक निर्देश

## पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर महापालिकेचे आवाहन; गळती रोखा, पर्जन्यजल संचय वाढवा आणि पाण्याचा पुनर्वापर करून अपव्यय टाळा.

**पिंपरी | प्रतिनिधी**

घरगुती तसेच व्यावसायिक आस्थापनांमधील फ्लश टँक, नळ आणि जलवाहिन्यांमधील गळती तत्काळ दुरुस्त करावी. पाण्याचा वापर कमी करण्यासाठी सर्व नळांना जाळी बसवावी. वाहन धुण्याचे टाळावे. व्यावसायिक वाहन धुलाई केंद्रांनी पाण्याचा पुनर्वापर करणाऱ्या यंत्रणांचा वापर करावा. खासगी व सार्वजनिक जलतरण तलावांमध्ये नवीन पाणी भरण्याचे टाळावे,' असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.



ते म्हणाले, 'नागरिकांनी पाणी वापरातील कार्यक्षमता वाढविणाऱ्या उपकरणांचा वापर करण्यास प्राधान्य द्यावे. शहरातील उपलब्ध जलस्रोतांचा कार्यक्षम वापर आणि पाण्याची दीर्घकालीन उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक स्तरावर पाणी बचतीच्या अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. नागरिकांनी घरगुती पातळीवर गळती रोखणे, जाळीचा वापर करणे, वाहन धुण्यासाठी नळाचे पाणी टाळणे तसेच पावसाचे पाणी साठवण यंत्रणा कार्यान्वित ठेवणे, या उपाययोजनांचा अवलंब करावा.'

'गृहनिर्माण सोसायट्या, व्यावसायिक आस्थापना, शैक्षणिक संस्था आणि उद्योगांनी नियमितपणे पाणी वापराचा आढावा घेऊन बचतीच्या उपाययोजना राबवाव्यात. पर्जन्यजल संचय यंत्रणा कार्यान्वित ठेवावी. पाण्याचा पुनर्वापर वाढवून अपव्यय टाळावा. यामुळे भविष्यातील संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यास मोठी मदत होईल,' असे पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी म्हणाले.

### 'पालखी मार्गावरील अडथळे दूर करा'

» संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्यात सहभागी वारकऱ्यांना सुविधा द्याव्यात, तसेच पालखी मार्गावरील सर्व अडथळे दूर करावेत, अशी मागणी बुधवारी करण्यात आली. 'वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. सर्व आवश्यक सुविधा नियोजनबद्ध आणि सुरळीतपणे उपलब्ध करून देऊ,' अशी ग्वाही पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने दिली.

महापौर रवी लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळाप्रमुख ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त ॲड. रोहिणी पवार, चैतन्य कबीर महाराज, देहू संस्थानाचे विश्वस्त उमेश मोरे, सहायक पोलीस आयुक्त सतीश नांदुरकर बैठकीला उपस्थित होते. बैठकीत पालखी मार्गावरील वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य सुविधा, आपत्कालीन सेवा, तसेच वारकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध मूलभूत सुविधांबाबत चर्चा करण्यात आली. पालखी मार्गावर येणाऱ्या वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुविधायुक्त वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

# पाणी कपातीने झाली बोअरवेलची आठवण!

## वापराअभावी बंद पडलेल्या बोअरवेल पुन्हा जिवंत करण्याचे आव्हान; तात्पुरत्या पाण्याच्या टाक्या बसवण्यासाठी सोसायट्यांना आर्थिक भुर्दंड.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात सोमवारपासून दिवसाआड पाणी कपात सुरू झाल्यामुळे नागरिकांची चांगलीच धावपळ उडाली असून, पाण्यासाठी आता सोसायट्यांची पावले वर्षानुवर्षे बंद असलेल्या बोअरवेलकडे वळली आहेत. अनेक सोसायट्यांच्या इमारतींची बांधकामे सुरू करण्यापूर्वी बांधकाम व्यावसायिकांकडून पाण्याचा स्रोत म्हणून बोअरवेल घेतल्या होत्या. मात्र, गेल्या काही वर्षांत महापालिकेकडून मुबलक पाणी मिळत असल्याने या बोअरवेल वापराअभावी बंद होत्या.

आता पाणी कमी पडू लागल्याने त्या पुन्हा सुरू करण्यासाठी शहरभर सोसायट्यांची धावपळ सुरू झाली आहे. महापालिकेचे पाणी प्रामुख्याने पिण्यासाठी वापरून इतर गरजांसाठी बोअरवेलचे पाणी उपलब्ध झाले, तरी मोठा दिलासा मिळणार असल्याने या बंद पडलेल्या बोअरवेल पुन्हा सुरू केल्या जात असल्याचे चित्र शहरभर दिसत आहे.

शहराच्या जुन्या हद्दीत, तसेच प्रामुख्याने पेठा परिसरात आणि २०१७ पूर्वी नव्याने महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांमध्ये सिंहगड रस्ता, कोथरूड, कात्रज, धनकवडी, शिवाजीनगर, औंध, पाषाण, नगर रस्ता परिसरातील काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू करण्यापूर्वी बोअरवेल घेतल्या जात होत्या. महापालिकेचा पाणीपुरवठा मर्यादित असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी स्वतंत्र टाकी, तसेच वापराच्या पाण्यासाठी बोअरवेलच्या पाण्याची टाकी अशी व्यवस्था केली होती.

मात्र, महापालिकेने समान पाणी योजनेअंतर्गत नवीन पाण्याच्या टाक्या, तसेच जलवाहिन्या टाकण्यास आणि नियमित पाणीपुरवठा करण्यास सुरुवात झाल्यानंतर परिस्थिती बदलली. अनेक सोसायट्या, तसेच नागरिकांनी या बोअरवेलचा वापर बंद केला. परिणामी त्या अडगळीत पडल्या. मात्र, आता पाणीटंचाईचे संकट गंभीर झाले असून, महापालिकेने दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केल्याने पाण्याच्या टँकरची मागणीही वाढली आहे. त्यामुळे नागरिकांनी पुन्हा बोअरवेलकडे आपला मोर्चा वळविला आहे.



### शहरातील जलसंकट अधिक गंभीर

**» सिंहगड रस्ता, कोथरूड, कात्रज, धनकवडी, औंध, पाषाण, शिवाजीनगर आणि नगर रस्ता परिसरातील अनेक भागांमध्ये बोअरवेलचा वापर पुन्हा वाढू लागला आहे. महापालिकेने समान पाणी योजनेअंतर्गत नियमित पुरवठा सुरू केल्यानंतर या बोअरवेल बंद पडल्या होत्या. मात्र, सध्याच्या पाणीटंचाईमुळे टँकरवरील अवलंबित्व वाढले असून पर्यायी स्रोतांचा शोध सुरू आहे. भूजलाचा वाढता वापर भविष्यात चिंतेचा विषय ठरू शकतो. त्यामुळे पाण्याचा काटकसरीने वापर, पावसाचे पाणी साठवण आणि जलसंधारण उपाययोजनांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.**

### पाणीटंचाईमुळे बोअरवेलला पुन्हा मागणी

**» पुण्यात दिवसाआड पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर नागरिकांसह गृहनिर्माण संस्थांची धावपळ वाढली आहे. महापालिकेच्या पाण्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अनेक सोसायट्यांनी आता वर्षानुवर्षे बंद असलेल्या बोअरवेल पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. बांधकामाच्या काळात पाण्याचा पर्यायी स्रोत म्हणून घेतलेल्या या बोअरवेल नियमित पाणीपुरवठ्यामुळे वापरात नव्हत्या. मात्र, सध्याच्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर महापालिकेचे पाणी पिण्यासाठी आणि बोअरवेलचे पाणी इतर गरजांसाठी वापरण्याचा पर्याय सोसायट्यांना दिलासा देत आहे. त्यामुळे शहरभर जुन्या बोअरवेल दुरुस्त करण्याची लगबग सुरू झाली आहे.**

### वाढता खर्च आणि तांत्रिक अडचणी

**» बंद पडलेल्या बोअरवेल पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी सोसायट्यांना मोठा खर्च करावा लागत आहे. शहरात बोअरवेल दुरुस्ती करणाऱ्या तज्ज्ञ मनुष्यबळाची कमतरता असल्याने ग्रामीण भागातून कामगार बोलवावे लागत आहेत. यासाठी १० ते १५ हजार रुपयांपर्यंत खर्च येत असल्याचे सांगितले जाते. अनेक सोसायट्यांकडे महापालिका आणि बोअरवेलच्या पाण्यासाठी स्वतंत्र टाक्यांची सुविधा नसल्याने अतिरिक्त पाणी साठवणूक टाक्या उभाराव्या लागत आहेत. त्यामुळे पाणीटंचाईचा सामना करताना नागरिकांवर आर्थिक भारही वाढत आहे.**

---

# पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात शेषनागाच्या प्रतिकृतीची पुष्पसजावट

## गणेश जयंतीनिमित्त शेषनागाच्या भव्य आणि आकर्षक प्रतिकृतीची पुष्पसजावट करण्यात आली आहे.


**पुणे | प्रतिनिधी**

शेषनागाच्या प्रतिकृतींची मंदिरात केलेली आकर्षक आरास आणि गाभाऱ्यात विविधरंगी फुलांच्या शेषनागाच्या सजावटीमध्ये विराजमान श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीच्या चांदीच्या मूर्तीचे रूप पाहण्यासाठी भाविकांनी गुरुवारी सकाळपासून गर्दी केली. शेषात्मज गणेश जयंतीच्या निमित्ताने श्रीमंत मंदिरात ज्येष्ठ गायिका शैला दातार यांनी स्वरपूजा अर्पण केली.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टतर्फे शेषनागाच्या विविधरंगी फुलांच्या प्रतिकृती साकारुन सजावट करण्यात आली होती. याच दिवशी श्री गणेशाचा पाताळातील गणेश जयंती म्हणजेच शेषात्मज गणेश अवतार झाला होता.

मंदिरात गुरुवारी ब्रह्मवृंदांच्या उपस्थितीत पहाटे तीन वाजता ब्रह्मणस्पती सुक्त अभिषेक पार पडला. शैला दातार यांनी स्वराभिषेकातून गणरायाचरणी स्वरसेवा अर्पण केली. तसेच अभिषेक आणि गणेश याग झाला.

ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले,'गाणपत्य संप्रदायात भाद्रपद आणि माघ मासाप्रमाणेच ज्येष्ठ चतुर्थीचा श्रीशेषात्मज जन्मोत्सव महत्त्वपूर्ण मानला गेला आहे. त्याची आख्यायिका सांगितली जाते. भगवान ब्रह्मदेव सृष्टी रचनेच्या कार्यात असताना आपल्याच सृष्टीवर मोहित झाले. त्या मोहित अवस्थेत त्यांच्या नासिकेमधून एक बालक जन्माला आले. त्याच्याकडे पाहिल्यानंतर भगवान ब्रह्मदेव अधिकच मायायुक्त झाले. परिणामी आपल्या नव्या अपत्याला त्यांनी मायाकर असे नाव दिले.



### गणरायाचे मनोहारी रूप

**» शेषात्मज गणेश जयंतीनिमित्त श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. मंदिरात विविधरंगी फुलांपासून साकारलेल्या शेषनागाच्या प्रतिकृती आणि गाभाऱ्यातील विशेष आरास भाविकांचे लक्ष वेधून घेत होती. शेषनागाच्या सजावटीमध्ये विराजमान असलेल्या गणरायाच्या चांदीच्या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासूनच भाविकांनी मोठी गर्दी केली. धार्मिक वातावरण, फुलांची आकर्षक सजावट आणि भक्तिमय कार्यक्रमांमुळे मंदिर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. शेषात्मज गणेश जयंतीनिमित्त गणरायाच्या या अद्वितीय रूपाचे दर्शन भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरले.**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील रिफेक्टरी मेसचा परवाना तात्पुरता निलंबित

## अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन आढळल्याने एफडीएकडून कारवाई; विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत तडजोड नाही

**पुणे | प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील रिफेक्टरी मेसचा अन्न व्यवसाय परवाना तात्पुरता निलंबित केला आहे. एफडीएच्या राज्यव्यापी तपासणी मोहिमेअंतर्गत या रिफेक्टरी मेसची तपासणी करण्यात आली असून, त्यात अन्न सुरक्षा व स्वच्छतेसंदर्भातील विविध नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

एफडीएचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात भेसळयुक्त, निकृष्ट दर्जाचे तसेच अस्वच्छ पद्धतीने अन्नपदार्थ तयार करणाऱ्या आस्थापनांविरोधात जोरदार मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेचा भाग म्हणून पुणे शहरासह विविध भागांतील खाद्य व्यवसायांची तपासणी केली जात आहे.

विद्यापीठातील रिफेक्टरी मेसमध्ये स्वच्छता, अन्नसाठवण, अन्नहाताळणी आणि सुरक्षित अन्नपुरवठ्याबाबत आवश्यक निकषांचे पालन होत नसल्याचे निरीक्षण अधिकाऱ्यांनी नोंदविले. यानंतर संबंधित व्यवस्थापनाला सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, त्रुटी दूर होईपर्यंत परवाना निलंबित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचा स्पष्ट संदेश एफडीएकडून देण्यात आला आहे. राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था, वसतिगृह मेस आणि खाद्य आस्थापनांनी अन्न सुरक्षा कायद्याचे काटेकोर पालन करावे; अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.



### सर्व खाद्य आस्थापनांना इशारा

» रिफेक्टरी मेसवरील कारवाई ही केवळ एका संस्थेपुरती मर्यादित नसून राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था, वसतिगृह मेस आणि खाद्य व्यवसायांसाठी इशारा मानली जात आहे. अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करणे प्रत्येक आस्थापनासाठी बंधनकारक आहे. स्वच्छता, सुरक्षित अन्नसाठवण, गुणवत्तापूर्ण अन्नपुरवठा आणि कर्मचाऱ्यांची स्वच्छता याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नियमांचे उल्लंघन आढळल्यास परवाना निलंबनासह कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा एफडीएने दिला आहे.

### एफडीएची धडक कारवाई

» अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेबाबत विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत पुण्यातील विविध खाद्य आस्थापनांची तपासणी केली जात असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील रिफेक्टरी मेसमध्ये अन्नसुरक्षा निकषांचे पालन होत नसल्याचे आढळून आले. स्वच्छता, अन्नसाठवण आणि अन्नहाताळणीतील त्रुटींमुळे संबंधित मेसचा अन्न व्यवसाय परवाना तात्पुरता निलंबित करण्यात आला. या कारवाईमुळे शैक्षणिक संस्थांमधील अन्न गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

### विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य

» विद्यापीठातील हजारो विद्यार्थी दररोज रिफेक्टरी मेसमधील अन्नावर अवलंबून असतात. त्यामुळे अन्नाची गुणवत्ता आणि स्वच्छता राखणे अत्यावश्यक आहे. एफडीएच्या तपासणीत विविध नियमांचे उल्लंघन झाल्याचे समोर आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने तातडीची कारवाई करण्यात आली. संबंधित व्यवस्थापनाला आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून त्रुटी दूर झाल्यानंतरच परवाना पुन्हा सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे.

# पुण्यातून आत्ता धावतात त्याच्या दुप्पट रेल्वे गाड्या धावणार! काय आहे मेगा टर्मिनस प्लॅन?

## पुण्यातून आणखी 20 रेल्वेगाड्या धावणार; रेल्वे स्थानक विस्तारासाठी 600 कोटी, 6 नवे फलाट

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्याची वाढती लोकसंख्या पाहता येथे मेगा टर्मिनस उभारणीची आवश्यकता असून, त्या संदर्भातील कामाला प्रारंभ करण्यात येणार आहे. यासह पुणे रेल्वे स्थानक येथे ६ नवीन फलाट बनविण्यात येणार असून, अस्तित्वातील ६ फलाटांची लांबी वाढविण्यात येणार असल्याने रेल्वे वाहतुकीची क्षमता दुप्पट होईल,' अशी माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी बुधवारी दिली. त्यासाठी सहाशे कोटी रुपयांचा खर्च करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेसला अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी सुरुवात झाली. तसेच, पुणे रेल्वे स्थानकात यार्डच्या रिमॉडेलिंगची पायाभरणी वैष्णव यांच्या हस्ते करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार दूरदृष्य प्रणालीद्वारे या कार्यक्रमात सहभागी झाले. पुणे स्थानक येथे केंद्रीय नागरी विमानवाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, पुण्याच्या महापौर मंजूषा नागपुरे, आमदार विवेक कोल्हे, मध्य रेल्वेचे महाप्रबंधक राजीव श्रीवास्तव, पुणे विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेश कुमार वर्मा आदी उपस्थित होते.

'पुण्याची लोकसंख्या आणि रेल्वे प्रवाशांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे शहराला मेगा टर्मिनसची आवश्यकता आहे. पुणे स्थानकावर सध्या असलेल्या सहा फलाटांबरोबरच आणखी सहा नवे फलाट उभारण्यात येतील. त्यामुळे फलाटांची संख्या बारा होणार आहे. तसेच, स्थानकासाठी नवीन प्रवेशद्वार, आळंदी येथे टर्मिनल आणि घोरपडी येथे कोचिंग डेपो उभारण्यात येणार आहे. या सुविधांमुळे पुण्यातून आणखी २० रेल्वे चालविणे शक्य होणार आहे. तसेच, मालवाहतुकीच्या ७ फ्रेटलाईन्स, १७ स्टॅबलिंग लाईन बनविण्यात येत आहेत. फुरसुंगी येथे नवीन ५ स्टॅबलिंग लाईन्स तयार करण्यात येत आहेत. पुणे रेल्वे स्थानक येथील रेल्वेचे कार्यान्वयन अर्थात ऑपरेशन कंट्रोल जुन्या प्रणालीवर असून त्याऐवजी पूर्णतः डिजिटल प्रणालीवर होईल,' असेही त्यांनी सांगितले.




### पुणे-मुंबई प्रवास फक्त ४८ मिनिटांत

» केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई-पुणे बुलेट ट्रेन कॉरिडॉरमुळे दोन शहरांतील प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत पूर्ण होणार आहे. सध्या रस्ते आणि रेल्वे मार्गाने अनेक तास लागणारा प्रवास मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. यामुळे उद्योग, व्यापार, शिक्षण आणि रोजगाराच्या संधींना मोठी चालना मिळेल. दैनंदिन प्रवास करणाऱ्या व्यावसायिकांनाही याचा फायदा होणार आहे. बुलेट ट्रेनमुळे मुंबई आणि पुणे ही शहरे अधिक जवळ येऊन 'ट्वीन सिटी' संकल्पना प्रत्यक्षात येण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.